**ठाणे महानगरपालिका,ठाणे**

**महिला व बालकल्याण योजना सन 2009-2010** परीशिष्ट "अ"

**आर्थिक तरतूद रू. 750,00,000/-**

**(प्रस्तावित योजना)**

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | निराधार,निराश्रीत विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान. | निराश्रीत अनाथ विधवा महिलेच्या कुटुंबातील एका मुलीच्या विवाहासाठी विवाह अनुदान म्हणून रु.१०,०००/- एवढे अनुदान देणे. | १) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु.४०,०००/- च्या आत असल्याबाबत तहासिलदार / विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.<br>२) वधु-वराचा प्रथम विवाह असावा.<br>३) विवाहाची निमंत्रण पत्रिका (विवाह १ एप्रिल २००८ नंतर झालेला असावा.)<br>४) अर्जदार विधवा असल्याबाबत पतीच्या निधनाचा दाखला अथवा तसे सिध्द होणारी कागदपत्र.<br>५) वधु-वर यांचा वयाचा दाखला (मुलीचे वय १८ वर्षाच्या वर व मुलाचे वय २१ वर्षाच्या वर असावे).<br>६) विवाहानंतर पती/पत्नी एकत्रीत पोस्टकार्ड आकाराचा फोटो अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.<br>७) शासकीय / निमशासकीय संस्थेकडून अनुदान मिळाले नसल्याचे सत्यप्रतिज्ञापत्र.<br>८) अर्जदाराचे वास्तव्य ठाणे म.न.पा. क्षेत्रातील असावे. याबाबत योग्य ते पुराचे आवश्यक.<br>९) अर्जदार निराधार / निराश्रीत असल्याबाबत स्थानिक नगरसेवकांचे योजनेच्या लाभाकरीता शिफारस पत्र.<br>१०) या पुर्वी अनुदान मिळालेल्या अर्जदारांनी अर्ज करु नये.<br>११) या योजने अंतर्गत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त /उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील.<br>१२) संपूर्ण कागदपत्र सत्यप्रतीच्या स्वरुपात सादर करणे आवश्यक. | ३०० | ३०,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| २ | विधवा व परितकत्या /घटस्फोटीत महिलांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे. | ठाणे महानगरपालिका हद्दीतील विधवा / घटस्फोटीत स्त्रियांना व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत अथवा स्वयंरोजगारातुन साधन तयार करून अर्थार्जन करता यावे. तसेच कुटुंबातील आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी हातभार लावणे शक्य व्हावे या हेतूने छोटा उदयोग / व्यवसाय सुरू करण्यासाठी तसेच स्वयंरोजगार मिळवता यावा म्हणून अशा महिलांना उदा.अगरबत्ती,मेणबत्ती,लोणची/पापड,कागदी / कापडीपिशव्या,सुवासिकअत्तरे,स्टेशनरी,कटलरी ,विणकाम,शिवणकाम, हस्तकलेच्या वस्तु,गृहापयोगी वस्तु,किराणा, फुलविक्री,फिनेल,कपडयाचीपावडर,साबण ,बुकबायडिंग,फॉल बिडींग इ.वस्तु तयार क रणे अथवा विक्री करणे इ.तसेच लघुउदयोग करणेकरिता दरपत्रकात (कोटेशन) सादर केलेल्या प्रकल्प किंमतीच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू. ५०००/- पर्यंत अनुदान धनादेशाव्दारे विक्रेत्याच्या नावाने देण्यात येईल. | १) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रू.४०,०००/- आत असल्याबाबत तहसिलदार /विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.<br>२) अर्जदारांनी जो व्यवसाय करणार आहे त्याचे मूळ व विक्रीकर नंबर असलेले कोटेशन जोडावे. तसेच कोटेशनवर धारकाचे नांव,पत्ता,व सही शिक्का स्पष्ट असावा..धनादेश विक्रेत्याच्या नावाने काढला जाईल.<br>३) अर्जदाराने कमीत कमी १ वर्षे व्यवसाय चालू राहील व अनुदानाचा वापर व्यवसायासाठीच केला जाईल याबाबतचे सत्यप्रतिज्ञापत्र (रू.५० किंवा १००/- च्या स्टॅम्पपेपरवर) सादर करावे.<br>४) अर्जदार विधवा महिलेने पतीच्या मुत्यु दाखल्याची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडावी. / घटस्फोटीत महिलेने घटस्फोटा बाबत न्यायालयाच्या आदेशाची प्रर्माणित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.<br>५) लाभार्थीचे वास्तव्य ठाणे मनपा क्षेत्रातील असावे याबाबत योग्य ते पुरावे जोडणे आवश्यक आहे.<br>६) अर्जदाराने योजनेच्या लाभाकरिता स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र जोडावे.<br>७) अर्जदाराचे वय 18 किमान असणे आवश्यक.सोबत वयाचा पृष्ठयर्थ कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.<br>८) या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.–अति.आयुक्त/उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहिल. | ५०० | २५,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ३ | महिला बचत गटांस अनुदान देणे. | **आर्थिकदृष्टया कमकुवत व दुर्बल घटकातील 10** ते 15 महिला एकत्र येऊन दरमहा काही ठराविक रक्कम बचत करण्याची कार्यवाही सुरू करतात. त्या आपल्यापैकी काही महिलांची अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि कोषाध्यक्ष म्हणुन निवड करतात. बँकेत गटाचे नावे खाते उघडतात तसेच गटातील प्रत्येक सदस्यास गटामार्फत स्वतंत्र पासबुक देतात. बचत गटास गटाअंतर्गत लघुउदयोगा करिता तसेच बचतीचे प्रोत्साहन मिळणेसाठी प्रतिमहिला रू.1000/- प्रमाणे जास्तीत जास्त रू.10,000/- एवढा प्रोत्सहनात्मक निधी दिला जाईल. | १) ठाणे महापालिकेच्या हददीमध्ये महिला बचत गट कार्यरत असणे आवश्यक आहे (किमान 10 सभासद असणे आवश्यक)<br>२) शासकीय / निमशासकीय संस्थेकडून अनुदान मिळाले नसल्याचे बचत गटातील सभासद कोनत्याही बँकेचा किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा, तसेच तो इतर गटात सहभागी नसावा.सदर बचत गट अनुदान मिळाल्यानंतर कमीत कमी ३ वर्षे कार्यरत राहील याबाबत सत्यप्रतिज्ञापत्र.रू.50/100 च्या स्टँम्पपेरवर सत्यप्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक आहे.<br>३) महिला बचत गटाने 1 एप्रिल 2008 ते 31 मार्च 2009 अखेर पर्यंतचे लेखापरिक्षण होणे आवश्यक ( मासिक बचत,कर्ज व खर्चाचे विवरणपत्राची सनदी लेखापालाने लेखापरिक्षण केलेली प्रत सादर करावी.<br>४) बचत गट अर्ज करण्यापुर्वी 1 वर्षे अगोदर बचतीचे कामकज सुरू झालेला असावा. व त्याबाबतचे मासिक इतिवृत्त सादर करणे आवश्यक आहे तसेच पासबुकाची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.<br>५) सु.ज.श.रो.योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील नावे असलेल्या व यापुर्वी या योजनेचा लाभ घेतलेल्या बचत गटाने अर्ज करू नये.<br>६) नगरसेवकाचे योजनेच्या लाभाकरिता शिफारस पत्र.<br>७) अर्जासोबत बचतगटात सहभागी असलेल्या सर्व सभासदाची नांवे,पत्ता,फोटो,स्वाक्षरी सह अध्यक्षांनी प्रमानीत केलेली यादी जोडावी.<br>८) यापुर्वि सदर योजनेचा लाभ घेतला असल्यास अशा बचत गटाचा विचार केला जाणार नाही.<br>९)सर्व कागदपत्र सत्यप्रतीच्या स्वरूपात सादर करणे आवश्यक<br>१०) अशा प्रकारचा निधी कोणत्या गटास मंजुर करणे अथवा नामंजुर करणे बाबतचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त / उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील. | ३०० | ११,३०,०००/- |

| अ.क्र | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थी निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ४ | अंध,अस्थिव्यंग ,व कर्णबधिर मतिमंद मुले/मुली व महिला यांच्या शारिरीक,मानसिक उपचारासाठी आर्थिक मदत करणे. | 1) ० ते १६ वर्षाखालील मुले<br>2) ० ते कमाल ६० वर्ष वयापर्यंतच्या मुली / महिला<br>यांच्या शारिरीक व मानसिक उपचाराच्या दृष्टीने पुरक मदत म्हणून रू. 6,000/- एवढे अनुदान स्वरूपात अर्थसहाय्य देणे. | १) अर्जदाराच्या पालकाचे / अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रू40,000/- च्या आत असल्याबाबत तहसिलदार / विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.<br>२) मुले/मुली व महिला यांच्या जन्मतारखेच्या दाखल्याची किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत.<br>३) ठाणे जिल्हा शासकीय रूग्णालय / अली अवरजंग संस्था मुंबई येथील वैदयकीय तपासणी करून शारीरिक, मानसिक दृष्टया व्यंग असल्याचे नेत्रतज्ञ शल्य चिकित्सक,कान,नाक,घसा मानसोपचार तज्ञांचे सही / शिक्कयासहीत अपंगत्वाचे प्रमाणपत्र जोडावे.(किमान 40% अपंगत्व असावे.)<br>४) अर्जासोबत पोस्टकार्ड साईजचा व अंपगत्व सकृत दर्शनी दिसेल असा फोटो जोडणे आवश्यक आहे.<br>५) अर्जदारास यापुर्वी कोणत्याही शासकीय / निमशासकीय संस्थेचे अनुदान मिळालेले नसावे.<br>६) यापुर्वी या कार्यालयाकडून अनुदान मिळाले असल्यास अर्ज करू नये.<br>७) अर्जदाराचे / अर्जदाराच्या पालकाचे वास्तव्य ठाणे मनपा क्षेत्रातील असावे. नियमानुसार आवश्यक पुरावे जोडणे आवश्यक आहे.<br>८) सर्व कागदपत्रे सत्यप्रतीत सादर करणे आवश्यक<br>९) या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त /उपआयुक्त (म.बा.यो) यांना राहील | २५० | रु. १५,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ५ | महिलांना स्वंयरोजगार सुरु करण्याकरिता विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देणे | बेसिक ॲण्ड ॲडव्हान्स ब्युटी पार्लर कोर्स हस्तकलेचे विविध वस्तु बनविण्याबाबतचे मोफत प्रशिक्षणासाठी ठाणे शहरातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील महिलांना स्वावलंबी होणे करीता तसेच शासकीय / निमशासकीय नोकरीसाठी MS-CIT उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. शासनमान्य खाजगी सामाजिक संस्थेस प्रतिलाभार्थी कमाल रु.३,५००/- पर्यंत प्रशिक्षण शुल्क देणे. | १) **अर्जदाराचे / कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू.40,000/- च्या आत असल्याबाबत** तहसिलदार / **विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला** मागील वर्षाचा **उत्पन्नाचा दाखला**<br>२) अर्जदाराचे वास्तव्य ठाणे मनपा क्षेत्रातील असावे.<br>३) **शासकीय योजनेचा फायदा न घेतल्याबाबतचे रू. 50/100/- च्या स्टँम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र. व प्रशिक्षण पुर्ण करणेबाबत सत्यप्रतिज्ञापत्र.**<br>४) या योजने अंतर्गत अर्थसहाय्य दैण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त / उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील.<br>५) **अर्जा सोबत पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक**<br>६) **महापालिकेने प्रशिक्षणाची व्यवस्था जेथे केली असेल तेथे प्रशिक्षण घ्यावे लागेल.**<br>७) **सदर योजनेचा लाभ फक्त मुली /महिलांना देण्यात येईल.**<br>८) **सर्व कागदपत्र सत्य प्रतीच्या स्वरूपात सादर करणे आवश्यक** आहे<br>९) प्रशिक्षण देणा-या संस्थेने प्रशिक्षण शुल्कामधुन प्रशिक्षणार्थीस रु.100/- प्रमाणे दोन महिन्याचे रु.200/- विद्यावेतन व कीमान रु.300/-टुलकीट्स व प्रमाणपत्र अदा करणे बंधनकारक राहील. | ३०० | १०,५०,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ६ | गरीब मुलींच्या लग्नासाठी अर्थसहाय्य ( BPL लाभार्थींना प्राधान्य). | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील मुलीच्या विवाहासाठी रू.5,000/- विवाह अनुदान देणे. | १) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रू40,000/- च्या आत असल्याबाबत मा. तहसिलदार / विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला<br>२) वधु-वराचा प्रथम विवाह असावा.<br>३) विवाहाची निमंत्रण पत्रिका/.(विवाह 1 एप्रिल 2008 नंतर झालेला असावा.)<br>४) वधु व वर यांचा वयाचा दाखला (मुलीचे वय 18 वर्षाच्या वर व मुलाचे वय 21 वर्षाच्या वर असावे.)<br>५) विवाहानंतरचा पती / पत्नीचा एकत्रित पोस्टकार्ड आकाराचाफोटो अर्जासोबत जोडणे आवश्यकआहे.<br>६) शासकीय / निमशासकीय संस्थेकडून अनुदान मिळाले नसल्याचे सत्यप्रतिज्ञापत्र.<br>७) अर्जदाराचे वास्तव्य ठाणे मनपा क्षेत्रातील असावे. याबाबत योग्य ते पुरावे आवश्यक.<br>८) अर्जदारची आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबत स्थानिक नगरसेवकांचे योजनेच्या लाभाकरिता शिफारस पत्र.<br>९) या पूर्वी अनुदान मिळालेल्या अर्जदारांनी अर्ज करू नये<br>10) या योजेन अंतर्गत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त / उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील.<br>11) संपूर्ण कागदपत्र सत्यप्रतीच्या स्वरूपात सादर करणे आवश्यक. | १०० | ५,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ७ | महिला मंडळ/स्वयंसेवी संस्थांना उदयोग धंदयातील प्रशिक्षणासाठी अनुदान(ठामपा क्षेत्रातील अस्तित्वात असलेले महिला मंडळ व स्वंयसेवी नोंदणीकृत संस्थांना शहरी उदयोगातील प्रशिक्षणासाठी अनुदान या योजनेअंतर्गत देण्यात येते. | ठाणे महानगरपालिका क्षेत्रामधील अस्तिवात आलेल्या महिला मंडळ व स्वंयसेवी नोंदणीकृत संस्थांना शहरीउदयोगधंदयातील प्रशिक्षणासाठी अनुदान या योजनेअंतर्गत देता येईल. | १) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महिलामंडळ/स्वंयसेवी संख्या कार्यरत असणे आवश्यक आहे.<br>२) १)संस्था नोदणी अधिनियम १८६० खाली नोंदणी झालेल्या महिला संस्था.<br>२)सार्वजनिक विश्रवस्त कायदा १९५० खाली नोंदणी झालेलया महिला संस्था.<br>३)कंपनी अधिनियम १९५० खाली नोंदणी झालेल्या महिला मंडळ<br>४)महाराष्ट्र सहकारी संस्या अधिनियम १९६० खाली नोंदणी झालेलया महिला संस्था.<br>३) शासकीय/निमशासकीय संस्थेमार्फत अनुदान न मिळाल्याबाबत तसेच सदर अनुदान प्राप्त झालेनंतर संस्था सतत ०३ वर्ष कार्यरत राहील. हमीपत्र रु ५०/१००/- च्या स्टॅम्पपेपरवर देणे बंधनकारक आहे.<br>४) महिला मंडळ/स्वंयसेवी संस्थेचे मागील १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च,२००९ अखेर पर्यंतचे लेखापरिक्षा अर्जासोबत सादर करणे आवश्यक.<br>५) अर्जासोबत महिला मंडळ/स्वंयसेवी संस्थेमध्ये सहभागी असलेल्या सर्व सभासदांची नावे,पत्ता,फोटो,हुद्दा व स्वाक्षरी सह अध्यक्षांनी प्रमाणीत केलेली प्रत जोडणे आवश्यक आहे.<br>६) या योजनेअंतर्गत लाभ देणेकरिता नगरसेवकाचे शिफारस पत्र<br>७) अशा प्रकारचा निधी कोणत्या महिला मंडळास स्वंयसेवी नोंदणीकृत संस्थेस मंजूर करणे अथंवा नामंजूर करणेबाबतचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त/उपआयुक्त(म.बा.यो.)यांना राहिल. | ५० | ५,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ८ | आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांना मोफत शिलाई मशिन पुरविणे | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या कुटुंबातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे,त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास मदत करणे तसेच त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणेकरिता मोफत शिलाई मशीन पुरविणे. | १) अर्जदाराचे वास्तवय ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील असावे. याबाबत नियमानुसार पुरावे सादर करणे आवश्यक.<br>२) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु.४०,०००/-आत असल्याबाबत तहसिलदार/विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला मागील वर्षाचा उत्पनाचा दाखला.<br>३) अर्जदाराचे वय किमान १८ असावे,याबाबत शासकीय पुरावे जोडणे आवश्यक<br>४) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लाभार्थी असल्याचे नगरसेवकाचे शिफारस पत्र आपश्यक<br>५) शासकीय/निमशासकीय संस्खेकडून अनुदान मिळाले नसल्याचे रु ५०/१००/- स्टॅम्पपेपरवा हमीपत्र आवश्यक (अर्जामध्ये नमुना सोबत जोडला आहे.)<br>६) यापूर्वी अनुदान मिळालेल्या अर्जदारांनी अर्ज करु नये<br>७) या योजनेअंतर्गत अर्थ सहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त/उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील. | १००० | ४०,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ९ | स्वयंरोजगार योजनेखाली आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील महिलांना व्यक्तीगत अर्थ सहाय्य देणे | ठाणे महानगरपालिका हद्दीतील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील महिलांना व्यक्तीगत स्वयंरोजगार सुरु करणेकरिता मदत अथवा अर्थाजन करता यावे तसेच कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारावी,हा उद्देश ठेवून छोटा उदयोग/व्यवसाय सुरु करण्यासाठी तसेच स्वंयरोजगार मिळवता यावा म्हणून अशा महिलांना<br>उदा.अगरबत्ती,मेणबत्ती,लोणची,पापड,कागदीपिशव्या,सुवासिक अत्तरे,स्टेशनरी,कटलरी,विणकाम,शिंवणकाम,हस्तकलेच्या वस्तू,गृहपयोगी,किराणा,फुल-फळ,पालेभाज्या,कांदेबटाटे,विक्री इत्यादी करणे तसेच सर्व प्रकारच्या गृहपयोगी वस्तु च खादयपदार्थ तयार करणे अथवा विक्री करणे इत्यादी .तसेच लघुउदयोग करणेकरिता दरपत्रकात(कोटेशन) सादर केलेल्या किंमतीचा ५०टक्के किंवा जास्तीत जास्त रु.५०००/-पर्यंत अनुदान धनादेशाव्दारे विक्रेत्याच्या नावाने देण्यात येईल. | १) **अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रू.40,000/- आत असल्याबाबत** तहसिलदार /**विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला** मागील वर्षाचा **उत्पन्नाचा दाखला.**<br>२) **अर्जदारांनी जो व्यवसाय करणार आहे त्याचे मूळ** व विक्रीकर नंबर असलेले **कोटेशन जोडावे. तसेच कोटेशनवर धारकाचे नांव,पत्ता,व सही शिक्का स्पष्ट असावा..धनादेश विक्रेत्याच्या नावाने काढला जाईल.**<br>3) **अर्जदाराने कमीत कमी 1 वर्षे व्यवसाय चालू राहील व अर्थ**सहाय्याचा **वापर व्यवसायासाठीच केला जाईल याबाबतचे सत्यप्रतिज्ञापत्र (रू.50/100/- च्या स्टॅम्पपेपरवर) सादर करावे.**<br>4) **लाभार्थीचे वास्तव्य ठाणे मनपा क्षेत्रातील असावे याबाबत** योग्य ते **पुरावे जोडणेआवश्यक**<br>5) **अर्जदाराने योजनेच्या लाभाकरिता स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र** जोडावे.<br>6) **अर्जदाराचे वय** किमान **18 असणे आवश्यक** आहे..सोबत वयाचा पृष्ठयर्थ कागदपत्र जोडणे आवश्यक.<br>7) या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त / उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहिल. | १००० | ५०,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १० | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील महिलांना मोफत घरघंटी पुरविणे. | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या कुटुंबातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे,त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करणे तसेच त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणेकरिता मोफत घरघंटी पुरविण्यात येईल. | १) अर्जदाराचे वास्तवय ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील असावे. याबाबत नियमानुसार पुरावे सादर करणे आवश्यक.<br>२) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु.४०,०००/-च्या आत असल्याबाबत तहसिलदार/विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला मागील वर्षाचा उत्पनाचा दाखला देणे बंधनकारक आहे.<br>३) अर्जदाराचे वय किमान १८ असावे,याबाबत शासकीय पुरावे जोडणे आवश्यक आहे.<br>४) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लाभार्थी असल्याचे नगरसेवकाचे शिफारस पत्र आवश्यक आहे.<br>५) शासकीय/निमशासकीय संस्थेकडून अनुदान मिळाले नसल्याबाबत रु.५०/१००/- स्टॅम्पपेपरवर हमीपत्र आवश्यक आहे.(अर्जामध्ये नमुना सोबत जोडला आहे.)<br>६) यापूर्वी अनुदान मिळालेल्या अर्जदारांनी अर्ज करु नये<br>७)या योजनेअंतर्गत अर्थ सहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त/उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील. | १०५० | १,२६,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ११ | आर्थिकदृष्टया गरीब मुलींना तांत्रिक अथवा व्यवसायिक प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत | ठाणे शहरातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुली/महिलांना स्वावलंबी होणकरिता तसेच तांत्रिक अथवा व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन रोजगार अथवा व्यवसायाची संधी त्यांना उपलब्ध होणेस मदत व्हावी,त्यांचा आर्थिक स्तर उंचवावा. याकरिता तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण मोफत व आर्थिक मदत करणे,प्रशिक्षंणासाठी शांसनमान्य खाजगी सामाजिक संख्येस प्रतिलाभार्थी कमाल रु ५०००/- पर्यंत प्रशिक्षण शुल्क देणे. | १) **अर्जदाराचे / कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू.40,000/- च्या आत असल्याबाबत** तहसिलदार / **विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला** मागील वर्षाचा **उत्पन्नाचा दाखला**<br>२) अर्जदाराचे वास्तव्य ठाणे मनपा क्षेत्रातील असावे.<br>३) **शासकीय योजनेचा फायदा न घेतल्याबाबतचे रू. 50/100/- च्या स्टँम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र. व प्रशिक्षण पुर्ण करणेबाबत सत्यप्रतिज्ञापत्र.**<br>४) या योजने अंतर्गत अर्थसहाय्य दैण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त / उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील.<br>५) **अर्जा सोबत पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक**<br>६) **महापालिकेने प्रशिक्षणाची व्यवस्था जेथे केली असेल तेथे प्रशिक्षण घ्यावे लागेल.**<br>७) **सदर योजनेचा लाभ फक्त मुली /महिलांना देण्यात येईल.**<br>८) **सर्व कागदपत्र सत्य प्रतीच्या स्वरूपात सादर करणे आवश्यक**<br>आहे. प्रशिक्षण देणा-या संस्थेने प्रशिक्षण शुल्कामधुन प्रशिक्षणार्थीस रु.100/-प्रमाणे दोन महिन्याचे रु.२००/- विद्यावेतन व्यवसायाचे किमान रु.300/- पर्यंत व प्रमाणपत्र अदा करणे बंधनकारक राहील. | १०० | ५,००,०००/- |

| अ.क्र. | योजनेचे नांव | योजनेचे स्वरूप | लाभार्थि निवडीचे निकष | भौतिक लक्ष | आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १२ | उच्च शिक्षण धेणा-या होतकरु मुलीसाठी एक रक्कमी अर्थसहाय्य ( BPL लाभार्थीना प्राधान्य) | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील होतकरु मुलींना उच्च शिक्षण, पोस्ट ग्रॅज्युएट उदा. एम .ए., एम.कॉम., एम.एस.डब्लु., एम.एल.एस., एल.एल.बी., एमएस्सी, डॉक्टर,इंजिनिअर,वैमानिक प्रशिक्षण,कृषी इ.मधील पदयुत्तर पदवी शिक्षण घेणेकरिता रु.१०,०००/- पर्यत एक रक्कमी अर्थसहाय्य देणे. | १) अर्जदाराचे वास्तव्य ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील असावे. याबाबत नियमानुसार पुरावे सादर करणे आवश्यक.<br>२) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु.४०,०००/-आत असल्याबाबत तहसिलदार/विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला मागील वर्षाचा उत्पनाचा दाखला.<br>३) अर्जदाराचे वय किमान १८ असावे,याबाबत शासकीय पुरावे जोडणे आवश्यक<br>४) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लाभार्थी असल्याचे नगरसेवकाचे शिफारस पत्र आपश्यक<br>५) शासकीय/निमशासकीय संस्खेकडून अनुदान मिळाले नसल्याचे रु५०/१००/- स्टॅम्पपेपरवा हमीपत्र आवश्यक (अर्जामध्ये नमुना सोबत जोडला आहे.)<br>६) यापूर्वी अनुदान मिळालेल्या अर्जदारांनी अर्ज करु नये<br>७) या योजनेअंतर्गत अर्थ सहाय्य देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त/उपआयुक्त (म.बा.यो.) यांना राहील. | २५० | २५,००,०००/- |